



॥ श्री ॥

- पावा -

प. पू. मंदाताई गंधे (अमरावती) यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेतील काही भाग -

ईशेच्छेने प. पू. काकांच्या वयाच्या सत्तराव्या वर्षाचा मंगल प्रारंभ नुकताच झाला आहे. त्यांच्या या वाढदिवशी त्यांच्या अनुग्रहित साधकांनी त्यांच्याच सत्तर पद्यरचनांचा संग्रह उपहार म्हणून त्यांना समर्पित केला आहे. ही बाब औचित्यपूर्ण तर आहेच, पण त्यापरींस ती अधिक हृद्य आहे. --
प. पू. काकांची विविध प्रसंगी, भिन्न काळी व विभिन्न स्थळी काव्यशक्ती स्फुरदरूप झाली व तीच या कवितारूपांनी प्रकटली हे या पुस्तकातील कविता वाचून लक्षात येते. त्यांचे काव्य बहुविषयस्पर्शी आहे. त्यांच्या वाणीत कवित्व आहे, त्यांच्या कवित्वात रसिकत्व आहे, त्यांच्या रसिकत्वाला परतत्त्वाचा स्पर्श आहे. 'वाचे बरवे कवित्व। कवित्वी बरवे रसिकत्व। रसिकत्वी परतत्त्व । स्पर्शु जैसा॥' ही माउली ज्ञानोबांची ओवी प. पू. काकांच्या कवितेला तंतोतंत लागू पडते. ---प. पू. काकांच्या ह्या कविता पुस्तकाने जीवनाच्या सर्वांगीण उदात्ततेचे दर्शन ह्या समजाला होईल. संकलकांनी त्यांच्या काव्यसागरातील सत्तर कवितारत्ने वेचली आहेत.
त्यांनी ह्या कविता कोणत्या एका विषयावर, ठराविक प्रसंगासाठी, विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन जाणीवपूर्वक रचलेल्या नाहीत. त्यामुळे त्यांची पूस्तकरूप बांधणी करताना या सत्तर कवितांचा अनुक्रम लावणे तसे अवघडच होते. ---
सर्व कविता वाचल्यावर वाचकाला प. पू. काका संतकवी, पंतकवी, निसर्गकवी, नवकवी यांपैकी नक्की कोण तसेच देवप्रेमी, गुरुप्रेमी, धर्मप्रेमी, देशप्रेमी, तत्त्वप्रेमी यांपैकीही नक्की कोण हे ठरविणे कठीण आहे असे लक्षात येते. कारण उघड आहे की, या पैकी प्रत्येक क्षेत्रातील त्यांची कविता सारखीच उत्कट, भावपूर्ण, अर्थगर्भ, समृद्ध, समर्पक, शब्दबद्ध व हृदयाला हात घालणारी आहे. मात्र अभ्यासांती निर्णय हाच होतो की, ते प्रथम तत्त्वप्रेमी व तत्त्वदर्शी आहेत व नंतर इतर सारे काही आहेत. ---
३) बहुतांश गीते वा कविता अर्थ समजण्यास व त्यातून निघणाऱ्या निष्कर्षाचा अंदाज लावण्यास दुर्बोध आहेत. भाषा, सरळ, सुबोध, ओघवती व परिचयाचीच आहे. दुर्बोधता आशयाच्या संबंधी आहे. कवीच्या 'त्या' वेळीच्या मनोभुमिकेचा ठाव घेणे कठीण आहे. म्हणायला छान सोप्या असणाऱ्या या कवितांच्या पोटी दडलेला संदेश हेरण्यासाठी सामान्य बुद्धीला सूक्ष्म (कृश) होण्याचा बराच व्यायाम करावा लागेल. असे वाटते की, या संग्रहातील अनेक कविता वा गीते कीर्तनाच्या ब्रह्म निरूपणाचे व प्रवचनाचे विषय आहेत.
४) वरवर पाहता सामान्य वाटणाऱ्या या कविता खास तत्त्वज्ञानपर आहेत. गहन अध्यात्म सांगतांना धर्म, नीती, भक्ती, सामाजिक न्याय, स्वत्व, विवेक, वैराग्य, कर्म, योग, ज्ञान या साऱ्या मूल्यांना स्वतःच्या काव्यात न्याय देण्याचे कवीचे कसब अतुलनीय आहे. हे कविता वाचताना सहज दिसते.

**पावा**

वाजवी रे गोड तुझा नाद मधुर पावा ॥धृ॥

देई ना कधी त्या पळभरी विसावा। निशिदिनि रे सुर मधुर त्यातूनी निघावा।

रमवी तो मजसि किती। अणु अणु तनुचे फुलती।

हरपण्यास देहभाव सतत वाजवावा॥१॥

प्रेम मधुर भाव मुळी न त्यातुनी सरावा। गोड नाद भरून त्यात किती तरी उरावा।

भुलवी जो वन भुवना। तरू गिरि सरिता सुमना।

गोप गोपि भुलवित तो, रानि-वनी भरावा॥२॥

पावा जो वाजवितो हृदयि साठवावा। ना कोठे बाहेरी, आंत वेध घ्यावा।

अहं अहं तो बोले। निशिदिनि तेथे डोले।

जीवन भर सादा या प्रतिसादचि द्यावा॥३॥

**पालखी**

(डॉक्टरकाकांनी मेडिकल कॉलेजात शिकत असतांना लिहिलेली कविता)

पालखी - चाले हळू डोलते भक्तगण - सिंधूपरी हालते

कोणी ते - लेझिमखुळ हालविती अन्य ते - मशालीस उजळिती

वाजती - नाद फटाके कुठे दणकती - बारबंदुक तिथे

घोष हा - हरिनामाचा उडे नौबती - उंच नगारा झडे

गुंगले - भक्तगण भक्तिने भान ना - काय कुठे सक्तिने ?

ओढती - पालखीस धन्य ते मुक्तऋण - पोहोचले धन्य ते

विकारा - वासना सर्व ही ठेविल्या - गुंडाळुनि स्वगृही

स्वार्थ ना - केवळ परमार्थ हा भक्तिचा - अगाध महिमाच हा

विसरले - शरीरास आपुल्या दाविती - नश्वर ते वाकुल्या

आतली - मूर्त कुणाची बरे ना मुळी - महत्त्व त्याला खरे

विठ्ठला - कृष्णा वा शंकरा बैसवा - केवळ की पत्थरा!

भावना - हीच निष्ठा खरी भक्तिचा - दीप हवा अंतरी

नाशिवंत - शरिर जरी जाहले शाश्वतची - भक्तिरूप राहिले

नाद हा - घुमवित ही पालखी श्रांत ना - चालतसे सारखी

**श्रीगुरुवंदना**

पाय तुझे वंदिताचि लटपटती बंधने॥ध्रु॥

बहुत जन्म तिमिराचे, तनुस संग की पडे

विषय नाद भोवला - तीचि मी धरी धने॥१॥

बंधन भय ते मोठे, बहुत पुण्य जै घडे

तू मजसी वेधिला - काय मी पळू मनें॥२॥

कितिक फुंज वेदाचा, सतत तव भये दडे

तू चित्सुख कोंदला - मी तुझा तनें मनें॥३॥

घुमत नाद सोऽहम् चा, बंधन ते की कुडे

तो मजला लोपला - ना उरली साधने॥४॥

भरूनि राही अंतर ते, हृदयि जे वसे फुडे

तो मज तू बोधिला - ती सरली क्रंदने॥५॥

**सांग तरंगा**

सांग तरंगा मजसी सांग जरा

तुझाची तू की नीराचा ह्या खरा? ॥ध्रु॥

आठव तू तुज पवनाने लोटिले

तरंग नावे जळावेगळे केले

तेचि नाव तू हृदयी सांभाळिले

आता तरी तू जागा होई, सोडी भलती तऱ्हा॥१॥

अरे जळावरि चंद्राच्या कर्षणे

सागरासी रे तुझे लाभले लेणे

तुजला फिरुनि जणूं तेचि की होणे

तुझा शोभला सागरावरी सुंदरसा की तुरा॥२॥

ओंजळीत मी तुजला घेऊ जाता

जळावाचुनी काही ना ये हाता

'तरंग मी' हे, विसरे तू रे आता

'जळ मी आहे' ऐसा ठेका, एकची लावी सुरा॥३॥

पाण्यावरती पाण्याची रांगोळी

उन्हात चमके शोभा ही आगळी

आता राहे खुशाल खेळी मेळी

सुखरूपत्वे आनंदाचा अनुभव घेई पुरा॥४॥

**बरसात**

रिमझिम रिमझिम चाले बरसात

चैतन्याच्या जलदांची ही चाले बरसात ॥धृ॥

कुंजवनी येई कान्हा। घुमवित मधु ताना

अंगी भरे शिरशिरी। चाले बरसात॥१॥

शुद्ध सत्त्व वाहे वारा। भेद मेघा नुरे थारा

नुरे कुणी भवांबरी। चाले बरसात॥२॥

ज्ञानविजू रेखा उमटे। सोऽहं शब्दामाजी दाटे

अज्ञानासी नाही थारा। चाले बरसात॥३॥

घन जैसे कृष्ण कांती। बरसती परा शांती

मन मनासि आवरी। चाले बरसात॥४॥

**आम्ही हिंदू हिंदू**

आम्ही हिंदू हिंदू? दैवत अमुचे वंदू। दुसरे ते ना निंदू। शब्दे ऐका॥१॥

देव पत्थरा मानू। कोटिकोटि ही वानू। भाव, एकला भानू। उजळी सारे॥२॥

तो पत्थर जरी कां फुटे। भाव न तेथे घटे। दुसरा भावें नेटें। उभा करू की॥३॥

जे दुःशासन - रावण। जे कंस जे दुर्योधन। सहकारी जे करण। तयां निवारूं॥४॥

ना वैरालागी वैरी। गुणवंता कैवारी। कृतज्ञता ती शिरी। वाहू आम्ही॥५॥

एक पंचमी व्याळा। दुसरी वसंतकळा। एक पांडवा सबळा। गुणवंताते॥६॥

आम्हा वैभव हवे। आम्ही घेउं नवे। मूळ न सोडू कवे। धरिले जें का॥७॥

प्राण आमुचा धर्म। न्याय नीतिचे कर्म। समतेचे जे वर्म। आम्ही जाणूं॥८॥

ललना रणरागिणी। सकल कलांच्या खाणी। वेदहि बोले वाणी। भर दरबारी॥९॥

ही माती अमुची माता। निज मातेपरि नांदता। मग आम्हाही बंधुता। भलतेयाही॥१०॥

आता ती ना वाटू। म्हणे तयातें दाटू। प्राणपणाने झगटू। जिंकू आम्ही॥११॥

**हे पर्वतेश्वरा** ---

हे पर्वतेश्वरा! तू ध्यानाला बसतोस

तुझी ध्यान मुद्रा दिसू नये म्हणून - ढगाआड लपतोस!

पण तुझी समाधी लागल्यावर - ढग जातात विरून!

हे पत्थरेश्वरा! तुझे ध्यान तरी कसे?

वरून ऊन पाऊस - बाजूनी वेगवान प्रवाहाचे वळसे

ना छत्री ना शाल हे सारे तुला कसे रे सोसे?

हे आकाशा! तुझे निळे निळे ध्यान

दिवसा सूर्याचे चटके, म्हणून देवाला तुझी दया येऊन

रात्री दिला चंद्र!

आता जा समाधी सुखात रंगून!

***